REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# "ह.मो.मराठे यांची महानगरी कादंबरी"

प्रा.डॉ. राजेंद्रसिंग जगन्नाथ देवरे
लोणावळा एज्युकेशन ट्रस्टचे ,
डी.बी.एन.पी.कला,श्रीमती एस.जी.गुप्ता वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय लोणावळा.

## प्रस्तावना :


ह.मो.मराठे यांच्या साहित्यलेखनात वैविध्य दिसून येते. आपल्या एकूण कारकिर्दीत कथा, कादंबरी, वृत्तपत्रसृष्टीशी संबंधित वैचारिक लेखन, आत्मचरित्रपर लेखन केले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात त्यांच्या नागरी कादंबरीचा विचार करणार आहोत.ह.मों.चे महाविद्यालयीन व व्यावसायिक जीवनाचा संबंध औद्योगिक जगताशी आला.कामगार जीवन, कामगार संघटना, अधिकारी व मालक यांच्यातले ताणतणाव, यंत्रयुगाचा वाढता प्रसार, उत्पादित माल खपविण्याची स्पर्धा, सत्ता व लेखणी यांच्यातील संघर्ष यांचा वेध त्यांनी इतिवृत्त प्रास्ताविक (1982), सॉफ्टवेअर (1989), मार्केट (1989) या कादंब-यांतून घेतला आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात शहराचा विकास झपाट्याने होत गेला.औद्योगिकरणामुळे ग्रामीण भागातील लघुउद्योग बंद पडायला सुरूवात झाली.शिक्षणाचा प्रसार वाढत गेल्याने नोकरी धंद्याच्या निमित्ताने शहराकडे हा नवशिक्षित वर्ग धाव घेऊ लागला.त्यातूनच शहरात मिश्र संस्कृतीचा उदय झाला.त्यामुळे नागरी व ग्रामीण समाजात संघर्ष निर्माण व्हायला लागला.याचा परिणाम सहित्य क्षेत्रावर होत गेला.साहित्यात याची प्रतिबिंबे उमटत गेली. मर्ढेकरांपासून ह्या औद्योगिक जीवनावर लिखाण होऊ लागले. झोपडपट्टी, कामगार जीवन, त्यांच्यातील संघर्ष नंतरच्या काळात होऊ लागले. या औद्योगिकरणाची विविध रूपे महानगरीय जीवनात अस्तित्वात आली.झोपडपट्टयांची विदारक रूपे, त्यांच्या जीवनातील वास्तव रूपे आवाहन करू लागली.

या महानगरीय जीवनाचा, अर्थव्यवस्थेचा, भ्रष्टाचाराचा आणि झोपडपट्ट्यांचा एक महत्वाचा परिणाम गुंडगिरी, अनैतिक व्यवहार, मूल्यहीन जीवन, वाढता चंगळवाद यात झाला. याविषयी भाऊ पाध्ये, जयवंत दळवी, मधू मंगेश कर्णिक, अरूण साधू हे वास्तव जीवन मांडत होते. तर ह.मो.मराठे कामगार, व्यवस्थापक व अधिकारी वर्ग यांच्या मानसिकतेचा शोध घेत होते.आपल्या अनुभवाशी प्रमाणिक राहून मराठे वास्तव जीवन रेखाटताना दिसतात.महानगरीय कादंबरीचाच एक भाग नागरी कादंबरी आहे.नवनागर साहित्य किंवा नागरी साहित्य असेही त्याला म्हणता येते.नागरी कादंबरी हा शब्द मराठे यांनीच रूढ केला आहे. नागरी कादंबरी म्हणजे काय याबद्दल ह.मो.मराठे म्हणतात, "केवळ कादंब-यांची कथानकं शहरात म्हणून त्यांना शहरी किंवा नागरी कादंबरी या प्रकारात टाकता येणार नाही.ख-या अर्थाने ग्रामीण कादंबरी किंवा ग्रामीण कथा कोणती? तर त्यातील कथानकाचा गाभा ग्रामजीवन हाच आहे ती.त्याचप्रमाणे खरी नागरी कादंबरी कोणती? तर त्यातील कथानकाचा गाभा नागरी किंवा शहरी आहे अशी".[1] मराठेंच्या कादंब-यांचा आशय बघितला तर त्यांच्या 'इतिवृत्त', 'प्रास्ताविक', 'सॉफ्टवेअर', 'मार्केट' या कादंब-या मराठेंच्या म्हणण्यानुसार या प्रकारात टाकता येतात.

ह.मो.मराठेंच्या नागरी कादंबरीच्या विवेचनाला पुष्टी देणारे मत दीपक घारे यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणतात - "कथानकाचा गाथा नागरी असेल आणि लेखकाचा दृष्टीकोनही या नागरी वास्तवातूनच घडलेला असेल तर ती नागरी कादंबरी होते".[2] मराठेंच्या कादंब-यांच्या बाबतीत हे मत योग्य वाटते. ह.मो.मराठेंनी आपल्या कादंब-यांमध्ये आधुनिक दृष्टीकोन मांडला आहे.त्यांछी 'इतिवृत्त' ही कादंबरी ग्रामीण राजकीय वाटत असली तरी लेखकाचा दृष्टीकोन हा आधुनिक आहे.या कादंबरीतले प्रश्न हे शहरी जीवनाशी निगडीत आहेत. त्यामुळे 'इतिवृत्त' ही कादंबरी नागरी कादंबरी या प्रकारातच मोडते.

नागरी कादंबरीची काही वैशिष्टये सांगता येतात.यामध्ये व्यक्तीपेक्षा समाजाला अधिक महत्त्व मिळते. खथानकाचा आशय हा आधुनिक दृष्टीकोनातून मांडलेला असतो.त्याचबरोबर या कादंब-यांमध्ये काल्पनिकतेला वाव नसतो.वास्तव दृष्टीकोनातून ही कादंबरी प्रकट व्हायला हवी. कादंबरीत असणारे जीवनचित्र हे सत्ता आणि संपत्ती या केंद्राभोवती घडलेले असावे.त्याचबरोबर या कादंबरीमध्ये येणारी शोकांतिका ही अर्थव्यवस्थेमुळे घडणारी असते. या अर्थव्यवस्थेमुळे नागरी स्वातंत्र्याच्या होत जाणा-या संकोचाचे वास्तव चित्रण या कादंबरीमध्ये दिसून येते.कथानकाला अनुसरून व्यक्तीरेखांची नावेही आधुनिक असल्याने या कादंब-या नागरी जीवन चित्रण करत असल्या तरी त्या सामाजिक स्वरूपाच्याच आहेत असे म्हणता येते.कारण लेखक सामाजिक जाणीवेतूनच हे लेखन करत असतो.



इतिवृत्त (1982)

समाजवादी संपादक व राजकीय सत्ता, औद्योगिक समूहातील आर्थिक शक्तीस्थाने यांच्यातला संघर्ष इतिवृत्तमध्ये दिसतो. श्रीरंग नाडकर्णी सारखा निर्भिडपणे काम करणारा संपादक हा पूर्वी मुंबईतील प्रतिष्ठित वृत्तपत्रात उपसंपादक म्हणून काम करत असतो. त्या वृत्तपत्रात त्याचा 'फेरफटका' नावाचा स्तंभ लोकप्रिय झालेला असतो. जुना संपादक बदलल्याने नवीन संपादक 'फेरफटका' हे सदर बंद करून टाकतात. त्यामुळे नाडकर्णीच्या लेखणीला वाव मिळत नव्हता. त्याची कुचंबल्यासारखी अवस्था होते. त्यामुळे दुसरीकडे नोकरीच्या शोधात असतांना 'जनता' या दैनिकाची त्याला संधी चालून येते.

महाराष्ट्रालगत एक नवे राज्य अस्तित्वात येते. हा प्रदेश एखाद्या जिल्ह्याएवढा लहान असतो. येथे 'जनता' दैनिक बंद पडण्याच्या अवस्थेत असतांना फळणीटकर ते विकत घेतात. ते नव्या दमाच्या संपादकाच्या शोधात असतानाच त्याचे सहकारी नाडकर्णीना संधी देण्यास सांगतात. संपादकाला संपूर्ण स्वातंत्र्य देण्याच्या अटीवर नाडकर्णी संपादक म्हणून काम करण्यास सुरूवात करतात.

राजकारणाला प्रसिद्धी मिळावी, आपल्या बद्दल चांगले छापून यावे ही प्रत्येकराज्यकर्त्याची इच्छा असते. म्हणून या राज्याचे मुख्यमंत्री संपादकाला भोजनाला निमंत्रित करतात. 'संपादकाचे मुख्यमंत्र्याबरोबर मैत्रीपूर्ण संबंध' अशा आशयाची बातमी छापून यावी अशी मुख्यमंत्र्यांचा मेहूणा भोगले यांची इच्छा असते. परंतु संपादक ती बातमी छापत नाही. भोगले संपादकाला विनंती करतात, त्यांच्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न करतात. बातमी न छापल्याने एक प्रकारे संघर्षाला सुरूवात होते.

नाडकर्णी संपादक झाल्यापासून वृत्तपत्राचा कायापालट घडवून आणतात. त्याच्यामागे त्यांची खंबीर निःस्पृह लेखणी असते. सामाजिक आर्थिक अन्यायाचे एकेक प्रकरण नाडकर्णी हातात घेतात. अग्रलेखात मुख्यमंत्र्यांवर टीका करतात. 'नुसते आश्वासन न देता प्रत्यक्ष कृती करावी' असा संदेश ते देतात. त्यांच्या विविध अग्रलेखामुळे त्यांना चांगल्या वाईट प्रतिक्रियाही मिळत जातात. त्याचबरोबर ते वृत्तपत्रीय लेखनात सुधारणाही करण्याचे आपल्या सहका-यांना सुचवतात.

वृत्तपत्राला राजकीय, सामाजिकदृष्टया खुपच महत्व असते . चांगल्या वाईट बातम्या समाजापर्यंत पोहोचवण्याचे काम वृत्तपत्राला करावे लागते. त्यामुळे भ्रष्टाचारी लोक संपादकांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवण्याचा प्रयत्न नेहमी करतात. या कादंबरीतही मुख्यमंत्र्यांचा हस्तक, कवी, कारखानदार हे नाडकर्णीशी चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न करतात. निःस्पृह वृत्तीचे संपादक या चांडाळचौकडीपासून सावध असतात. वृत्तपत्राला वाचनीय बनविण्यासाठी वेगवेगळी सदरे तयार करतात. त्यामुळे वृत्तपत्राचा खप वाढण्यास मदत होते.

सामजिक बांधिलकी जागृत ठेवून संपादक समाजातल्या अनेक प्रश्नांना वाचा फोडतात. मुख्यमंत्र्यांचे भ्रष्टाचारी धोरण, हॉटेल कामगारांचे प्रश्न, कारखानदारीमुळे होणारे प्रदुषण या विरूद्ध आवाज उठवतात, त्यामुळे समाजजागृती होत जाते. याबरोबरच हे भ्रष्टाचारी लोक संपादकावर दबाव आणण्याचा प्रयत्न करताना दिसतात. पण संपादकाची लेखणी थांबत नाही. समाजातील अनेक कार्यकर्ते संपादकाच्या लढयात सामील होतात. त्यात भाई गोखले, विरोधी पक्षाचे आमदार, पोलिस अधिकारी, गावातील कार्यकर्ते इत्यादींबरोबर बाळासाहेब फळणीटकर अप्रत्यक्षपणे सामील असतात. यामुळे संपादकाचा उत्साह वाढत जातो.

पर्यटन व्यवसायाच्या विकासाच्या नावाखाली मुख्यमंत्री नवी योजना आखतात. ह्या योजनेत पंचतारांकित हॉटेल भोगलेच्या पत्नीच्या नावावर मंजूर करून आणतात. हे हॉटेल शहरातल्या आरक्षित जागेवर बांधले जात असल्याचे कळल्यावर संपादकाचे वार्ताहर त्याठिकाणी गेल्यावर त्यांना मुख्यमंत्र्यांच्या गुंडांकरून मारहाण केली जाते. मारहाणीची तक्रारही पोलिस नोंदवायला तयार होत नाहीत. त्यामुळे संपादक व मुख्यमंत्र्यांचा संघर्ष तीव्र होत जातो. वर्तमानपत्रात याविरूद्ध आवाज उठवला जातो.

मुख्यमंत्र्यांच्या भ्रष्टाचाराबरोबर 'दळवी इंडस्ट्रीज' च्या प्रदुषणामुळे होणा-या दुष्परिणामांना ते आपल्या वृत्तपत्रात स्थान देतात. ह्या खाताच्या कारखान्याची होणारी बदनामी फळणीटकरांना फायदेशीर च ठरणार असते. कारण त्यांना खताच्या कारखान्याची परवानगी मिळण्याच्या मार्गावर असते. धंद्यातला भावी शत्रु असल्यामुळे फळणीटकरांचा मुलग संपादकाच्या भूमिकेला अप्रत्यक्षपणे पाठिंबा व्यक्त करतो. हाच मुलगा सुरूवातीला संपादकाच्या भूमिकेला विरोध करत असतो. फळणीटकरांचे मुख्यमंत्री व दळवी चांगले मित्र असतात संपादकाला, त्याच्या भुमिकेला आवर घालावा असे म्हणून फळणीटकरांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जातो. पण संपादकाला संपूर्ण स्वातंत्र्य दिलले असल्याने फळणीटकर आपल्या भूमिकेशी ठाम राहतात.

मुख्यमंत्र्यांचे भ्रष्टाचार वाढतच चालले असल्याने, बिहारच्या भ्रष्टाचारविरोधी आंदोलनाच्या पार्श्व भूमीवर आंदोलन छेडण्याचा प्रयत्न संपादक करतात. त्यामुळे जनतेत असंतोष निर्माण होतो. भ्रष्टाचाराविरूद्ध आवाज उठवण्यासाठी भाई गोखले, समाज परिवर्तन दलाचे डॉ. अनिल वाळिंबे, महिला कृती समितीच्या प्रेमाताई वर्तक, विरोधी आमदार इ. सभा, आंदोलने करतात. या आंदोलनाची बातमी मिळवून छापण्याच्या तयारीत असतांना 'जनता' वृत्तपत्राच्या कचेरीवर विध्वंसक हल्ला होतो. वर्तमानपत्राच्या सर्व प्रती जाळून टाकण्यात येतात. संपादकाचा हा लढा या ठिकाणी तीव्र होतो.

दरम्यानच्या काळात फळणीटकरांना खताच्या कारखान्याची परवानगी मिळते. शेवटी मुख्यमंत्र्यांच्या सहीशिवाय कारखाना उभा राहू शकत नव्हता. त्यामुळेमय्ख्यमंत्री या संधीचा फायदा घेऊन फळणीटकरांना अडचणीत आणतात. स्वतःच्या आर्थिक हितसंबंधाच्या मार्गात संपादकाचा अडथळा निर्मा ण झाल्याने नाईलाजाने फाळणीटकर संपादकांना म्हणतात "आपण काही मुख्यमंत्री बदलू शकत नाही, तेव्हा आपणच बदलले पाहिजे" असा सल्ला देतात. फळणीटकरांच्या वक्तव्याचा भावार्थ समजल्याने संपादक अभिमानाने आपला राजीनामा देतात. एका राजकीय पक्षाच्या माणसामुळे संपादकाची लेखणी थांबते, त्याचबरोबर लढाही थांबतो.

प्रास्ताविक

सामाजिक जाणीवा असलेल्या मनोहर आठवलेंच्या जीवनातील एका दिवसाच्या धावपळीचे चित्रण या कादंबरीत आहे. मनोहर आठवले परांजपे उद्योग समूहाच्या श्रीकृष्णकृपा या हाऊसजर्नलचा संपादक म्हणून कार्यरत आहे याठिकाणचे संपादक पद मोठया कष्टाने त्याने मिळवलेले आहे. वरिष्ठांची त्याला या ठिकाणी घेण्याची इच्छा नसते. कारण वरिष्ठांना दुस-या कोणालातरी घेण्याचा विचार असल्याने मनोहर आठवले त्यांचा कट उधळून लावतो व स्वतः संपादक होतो. त्यामूळे वरिष्ठांच्या संकटाची छाया त्याच्यावर नेहमीच असते. अशा परिस्थितीत मालकाला खुष करण्याची संधी त्यांच्या षष्ठीच्या कार्य क्रमाच्या निमित्ताने संपादकाला मिळते. त्या निमित्ताने मालकाविषयीचा गौरव अंक काढण्याची योजना तयार करतो.

गौरव अंकाचे निम्मे अधिक काम पूर्ण होत आलेले असते. षष्ठीचा कार्यक्रम आठ दिवसांवर आला असतांना त्याचे वरिष्ठ फियास्को साहेबांनी चार दिवसांत अंक तयार करण्यास धमकीवजा सांगितल्याने तो चिंताग्रस्त होतो. अंकाचे काम पूर्ण करणाच्या तयारीला तो लागतो. सकाळीच घराच्या बाहेर पडतांना दिनक्रम आखतो. पण त्याला घरातून बाहेर पडण्याआधीच अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. संकटाचे ओझे डोक्यावर असतानाच त्याचे शेजारी त्याच्या दिनक्रमात अडथळे आणण्यास सुरूवात करतात. तो ज्या इमारतीत राहत असतो त्याच्या आजूबाजूला झोपडया वसल्याने त्याचे शेजारी झोपडयांविरूद्ध कारवाई करण्याची योजना आखत असतात. त्यासाठी सकाळीच चर्चा करण्यासाठी आठवलेला बोलावतात. याठिकाणीच कथानकाला सुरूवात होते.

संपादक सामाजिक बांधिलकी मानणारा असला तरी वेळेचे बंधन असल्याने तो त्यात जास्त वेळ भाग घेत नाही. त्वरीत जयू हिला भेटण्यात जातो. मालकाच्या कार्यक्रमाची बातमी दूरदर्शनवर यावी म्हणून तो प्रयत्न करत असतो. म्हणून तिची खोटी स्तुती करण्यास बराच वेळ जातो. अशा प्रकारे पुढेही त्याला वेळ खाऊ डाव्या विचारसरणीची माणसे भेटत जातात. त्याला त्याच्या मित्राच्या मुलाचा ॲडमिशनचा प्रश्न सोडवावा लागतो. त्यामुळे त्याच्या वेळेचे बंधन विस्कळीत होत जाते. ऑफिसला जाण्याच्या वेळेतच मित्राच्या मुलाच्या प्रवेशाच्या प्रश्नासाठी परत त्याच्याच कॉलनीतल्या प्रिंसिपल चिटणीस बाई कडे जावे लागते. झोपडपट्टीच्या प्रश्नाविषयी त्याला बोलण्यास वेळ नव्हता. पण मित्राच्या कामासाठी आल्याने त्याला चिटणीस बाईंचे पती हिणवतात. पैशाच्या देवाणघेवाणीतून प्रवेशाचे काम पूर्ण करण्यास तयार होतात, म्हणून तो त्वरित बाहेर पडतो. रस्त्यात पुन्हा मुलांना इंग्रजी शाळेत घालणार नाही असे म्हणणारा व आता मुलाला आय.ए.एस. करू पाहणारा बालमित्र जोगळेकर त्याचा वेळ घेतो.

अंकाच्या कामाच्या मदतीसाठी अकार्यक्षम असलेल्या सौ. कोरेंना नेमलेले असते. संपादकाची धडपड चालू असतांना त्या एकही काम पूर्ण करू शकत नाहीत. प्रत्येक वेळी त्या असमर्थतता दाखवतात. अंकाचे निम्मे काम अपूर्ण असते. त्यासाठी काही फोटो, कथा, छायाचित्रे घेण्यासाठी ऑफिसमधून बाहेर पडतानाच देशभक्त तात्याजी रानडे यांच्या नावावर विविध अंक काढून पैसे कमावणारा इंद्रनील रानडे त्याचा बहुमूल्य वेळ घेतो. संपादकाला अंक पूर्ण करण्याची घाई असतांनाच अशी अनेक वेळखाऊ माणसे भेटत जातात. त्याच्या मानसिकतेचा विचार कोणालाच नसतो. पुढे चरित्र लेखक भाऊ देशपांडेंकडे तो गेल्यावर **500** रूपये मानधन देण्याच्या अटीवर कथा लिहून देण्यास तयार होतात. त्याचवेळी त्याची स्कुटर चालू होण्यास बराच वेळ जातो. प्रा. पुरंदरे नेमके याच वेळी भेटून त्याला आग्रहाने घरी घेऊन जातात. मद्यपान करत अनिच्छेने गप्पा सुरू होतात.

मग दुपारपर्यंत झोपणा-या ओगले या कथालेखकाकडे तो जातो. पैसे कमावण्याच्या हेतूनेच ओगले कथा लेखन करीत असतो. त्याचीही खोटी स्तुती करतो. उद्यापर्यंत कथा द्यावी अशी कळकळीची विनंती करून ओगलेच्या कथेवर चित्र काढून देणा-या अनिलकडे जातो. तेथे गेल्यावर आणखी एक संकट उभे राहते. मित्राच्या बायकोने आत्महत्या केल्याने अनिल दुःखी अवस्थेत चित्र काढण्यास तयार होत नाहीत. म्हणून आठवले प्रेसवाल्याकडे जातो. प्रेसमध्येही कामगारांचा संप सुरू होण्याच्या मार्गावर असतो. त्यामुळे प्रेसवाले अंक छापून देण्यास असमर्थता दाखवतात. संप मिटेल व अंकाची छपाई होईल ह्याच आशेवर राहिलेले काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने तो बाहेर पडतो.

मालकाचे पूर्वायुष्यातील जुने फोटोही अंकात छापायचे असल्याने तो शेटजींची घटस्फोटीत मुलगी दिदिला भेटतो. या दिदिने पूर्वायुष्यात एका प्राध्यापकाबरोबर प्रेमविवाह केलेला असतो. पण बापाच्या श्रीमंतीमुळे ती घटस्फोट घेऊन परत शेटजींकडे राहत असते. तीने शेटजींवर एक कविता केलेली असते. त्याला नाईलाजाने तीची कविता ऐकावी लागते. खोटी स्तुती करूनजुनी छायाचित्रे मिळवतो. ही छायाचित्रे घेऊन चित्रकार कदमांकडे जातो. चित्रकार कदम हजार रूपये मानधनावर चित्र काढण्यास तयार होतो.

सर्व दिवसभरात त्याला वेळखाऊ व फक्त बडबड करणारी माणसे भेटत जातात. एकही काम पूर्ण झालेले नसते. फियास्को साहेबांना दिवसभराच्या कामाचा अहवाल सादर करतो. त्याचबरोबर शेटजींच्या मुलीची कविता षष्ठीच्या कार्यक्रमात घेण्याची सूचना करतो. त्याच्या वरिष्ठांना संपादकाची मानहानी करण्याची संधी मिळते. अंकाचे काम पूर्ण होऊ शकत नाही या सबबीखाली प्रकाशनाचा कार्यक्रम रद्द करतात. त्याजागी शेटजींवरच्या कवितेचे वाचन ठेवतात. या अंकाची कल्पना आठवलेची असते. पण असहकार्याच्या या जगात त्याच्या धडपडीला किंमतच नसते. सकाळपासूनची त्याची धावपळ व्यर्थ गेलेली असते. त्यामुळे हताश अवस्थेत घरी निघतो. रस्त्यात मित्र भेटतो. त्याच्याबरोबर असलेल्या त्याच्या मित्राशी त्याचे मतभेद होतात. रात्री उशीरापर्यंत मद्यपान करून घरी गेल्यावर त्याची पत्नी शरीर संबंधास नरक देते. दिवसभर मिळत असलेल्या नकारामुळे तो व्यथित झालेला असतो. त्यात बिअरच्या नशेमुळे उद्दिपीत झालेला असल्याने पत्नीशी जबरदस्तीने संभोग करतो. त्याची त्याला नंतर लाज वाटते म्हणून गॅलरीत उभा राहतो त्यावेळी पुन्हा झोपडया उभ्या राहत असतांना दिसतात.

मध्यमवर्गीय माणसाला समाजात वावरताना आपली तत्त्वे बाजूला ठेऊन किती तडजोडी कराव्या लागतात. त्याचबरोबर ताणतणाव सहन करूनही प्रश्न संपतच नाहीत. याचाच वेध या कादंबरीत मराठेंनी घेतला आहे.

सॉफ्टवेअर

'सॉफ्टवेअर' ही कादंबरी **1987** साली प्रकाशित झाली. ही कादंबरी औद्योगिक जगतातील घडामोडींवर आधारित आहे.

औद्योगिक जगतात कामगार, अधिकारी व मालक यांच्यातले संबंध स्नेहपूर्ण व सलोख्याचे असावेत यासाठी मॅनेजमेंट फिलॉसॉफी आणू पाहणा-या देशमुखांच्या योजनेला या समाजात स्थान नाही. कारण भांडवलदारांचे हितसंबंध, नातीगोती यामुळे देशमुख यांच्या विधायक विचारांना स्थान मिळत नसल्याने

त्यांना पराभव पत्करावा लागतो. याचे चित्रण करतांना ह.मो.मराठे यांनी समाजातील चंगळवादी वृत्ती कशी वाढत चालली आहे याचा वेध या कादंबरीत मर्मिकपणे घेतला आहे.

लेबर लॉ घेऊन एल.एल.बी. झालेले अर्थशास्त्राचे पदवीधर असलेले देशमुख प्रारंभीची दोन वर्षे प्राध्यापक होते. नंतर काही दिवस त वकीली करतात. पुढे बिझनेस मॅनेजमेंटचा कोर्स केल्यावर देशमुख कामगार विषयक अनेक समस्यांवर व्याख्याने व लेखन करू लागले. एका कंपनीत सल्लागार म्हणून काम करतांना 'भारताचे औद्योगिक धोरण उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा' या परिसंवादात ते आपला शोधनिबंध वाचतात. त्यावेळेस बी.वाय.पी. ग्रुपचे चेअरमन व भारतातील मोठे उद्योगपती एस.बी.पोंक्षे त्यांच्या निबंधाने प्रभावित होतात आणि बहुजन समाजासाठी काहीतरी करण्याच्या जाणीवेतून त्यांना आपल्या कंपनीत येण्याची विनंती करतात. समाज आणि कामगार यांचे हित पाहणा-या पोंक्षेंची विनंती ते मान्य करतात.

बी.वाय.पी.ग्रुपच्या अनेक शाखा असल्याने पोक्षेंचा थोरला मुलगा बी.एस.अरूणाचलम, भाचा सरवटे व गाडगीळ हे विविध शाखांचे काम पाहतात. एस.बी.पोंक्षे मुख्य म्हणून काम पाहत असतात. देशमुखांना कंपनीत कामावर घेण्यास अरूणाचलम् व भाचा सरवटे तयार नसतात. परंतु एस.बी.पोंक्षेंच्या निर्णयाबाहेर त्यांना जाता येत नसल्याने त्यांना नाईलाजाने देशमुखांना घेण्यास संमती द्यावी लागते. अरूणाचलम् हा आपल्या वडिलांपासून विभक्त राहत असतो. अरूणाचलम्चे लग्न पोक्षेंच्या मर्जीनुसार झालेले असते. त्यामुळे कौटुंबिक सख्य दोघांमध्येही नसते. कामगार वर्गाबद्दलही अरूणाचलम्ची कठोर भुमिका असते. स्त्रियांकडे तो नेहमीच वासनेच्या दृष्टीने बघत असतो. त्यामुळे कामगार वर्ग अरूणाचलम्च्या विरोधात असतात.

देशमुखांचे कुटुंब लहानच असते. पत्नी चांगली शिकलेली असते. घरी बसून कंटाळा येत असल्याने छोटा मोठा व्यवसाय करावा या हेतूने धडपडत असते. एके ठिकाणी पंधरा ते वीस हजारांना स्वतः फसली जाते. मुलगा कॉलेजमध्ये शिकत आहे. एका उद्योगपतीने कॉलेजला देणगी दिल्यामुळे त्याचा मुलगा कॉलेजमध्ये दहशत निर्माण करतो. देशमुखांच्या मुलालाही विनाकारण त्रास दिल्यामुळे अभ्यासात तो कमी पडत जातो. भांडवलदारीमुळे त्याचाही बळी जातो.

देशमुखांना सन्मानाने पोंक्षे चांगल्या पगारावर नेमतात. चेअरमनचे सल्लागार म्हणून नेमण्यात आल्यामुळे ते अधिक उत्साहाने काम सुरू करतात. पोंक्षे त्यांना सहकार्य करण्यास समर्थ असतात. कामगार व मालक यांचे संबंध सुधारावेत, उत्पादन चांगल्या दर्जाचे करावे, ग्राहकांचा, कामगारांचा विश्वास संपादन करावा, नवनव्या योजना त्यासाठी राबवाव्यात असे पोंक्षेंचे धोरण असते. ते यासाठी देशमुखांना वेगवेगळया योजना राबवण्यास सांगतात. अरूणाचलम्ने करमकर या ऑफिसरला कामावरून काढून टाकलेले असते. त्याची केस फाईल देशमुखांना देऊन त्यावर आपले मत कळविण्यास सांगितले जाते.

अरूणाचलम्ने करमकर या ऑफिसरला कामावरून काढून अन्याय केला होता. एका कामगाराला विनाकारण कमी करण्यासाठी या ऑफिसरने नकार दिलेला दिसतो. त्या कामगारावर अन्याय होऊ नये म्हणून करमकर त्या कामगाराची बाजू घेतल्याने अरूणाचलम् करमकरांना समजावण्याचे पत्र देतात. अतिशय हुशार असलेले करमकर स्वाभिमानाने राजीनामा देतात. देशमुखांनी करमकरांची सर्व माहिती वाचल्यावर अरूणाचलम्ने करमकरांवर अन्याय केला आहे हे स्पष्टपणे सांगतात. करमकरांना दुस-या विभागात काम द्यावे असे ते उदात्त दृष्टीकोनातून सुचवतात. अरूणाचलम् त्या निर्णयाने देशमुखांच्या विरोधात जातो. कामगार व मालक यांच्यातला संघर्ष होऊ नये, त्याबरोबर कंपनीची बदनामी होऊ नये याला पोंक्षेंचीही मनोमन इच्छा असते. त्यामुळे ते देशमुखांच्या निर्णयाला संमती देतात.

देशमुखांना या कंपनीत आल्यापासून उत्साह वाटू लागला होता. पोंक्षे त्यांना सहाय्य करीत व कामाची प्रशंसा करीत. कंपनीचा उच्च दर्जाचा अधिकारी म्हणून देशमुखांची ओळख करून देत असत. व्यवस्थापकीय कार्यासंबंधी अभ्यास करण्याची जबाबदारी देशमुखांवर टाकतात. त्यामध्ये व्यवस्थापक व इतर स्टाफ त्यांच्यातील मानवी संबंधाचा अभ्यास प्रामुख्याने करावयाचा, त्याचबरोबर कंपनीच्या सर्व युनिटस् मध्ये जाऊन तेथील कामगार, सुपरवायझर, अधिकारी यांच्यातले संबंध, कुणावर अन्याय होतो का? उत्पादनाची क्वालिटी, ग्राहकांचा विश्वास, त्याचबरोबर ऑफिसमध्ये बैठक व्यवस्था चांगली आहे का? निवृत्तीचे वय योग्य आहे का? इत्यादींविषयी अभ्यास करण्यास सांगतात. पोंक्षेंच्या या योजनेला मोठा मुलगा बी.एस.यांचा पाठिंबा असतो. अरूणचलम् व इतरांचा त्यांच्या योजनेला नाईलाजाने पाठिंबा द्यावा लागतो. देशमुख जबाबदारीने काम करून सर्व अहवाल तयार करतात.

या अहवालात सामाजिक दृष्टीकोनातून कंपनीने कामगार, अधिकारी व मालक यांच्यातले परस्पर संबंध सलोख्याचे, विश्वासाचे असावे, त्यांना कंपनी आपली वाटली पाहिजे, अशी भावना निर्माण करण्यासाठी आदर्श व्यवस्थापन असावे. तसेच कंपनीची बैठक व्यवस्था, कामगारांसाठी राबवल्या जाणा-या योजना यांच्यातही सुधारणा करण्यासंबंधी सुचवताना समाजाच्या विकासासाठी काही विधायक काम करावे असेही ठामपणे नमूद करतात. देशमुखांच्या मॅनेजमेंट फिलॉसॉफीचा अहवाल ऐकल्यावर पोंक्षे खुष होतात.

पोंक्षे **15** ऑगस्टची सुट्टीची संधी साधून 'मॅनेजमेंट फिलॉसॉफी' ग्रुपमधील सर्व कंपन्यांच्या अधिका-यांना समजावून सांगण्यासाठी हिलस्टेशनवत नेण्याचे ठरवतात. त्याचबरोबर एकत्र येण्याची भावना सर्वामध्ये निर्माण झाली पाहिजे असाही त्यामागे हेतू असतो. सर्व अधिकारी एकत्र येतात. पार्टीच्यावेळी अरूणाचलम् गद्रे या अधिका-याच्या पत्नीशी अश्लील चाळे करतात. त्यावेळी अरूणाचलम्ची पत्नी अश्लील चाळे करणा-या आपल्या नव-यावर रागावते. अरूणाचलम् पत्नीला शिवीगाळ करतो. देशमुख अरूणाचलम्ला शांत करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून दारूच्या नशेत असलेला अरूणाचलम् देशमुखला हाकलून देण्याचा भाषा करतो. त्यामुळे पोंक्षे अरूणाचलम्वर संतापतात.

मॅनेजमेंट फिलॉसॉफीला अरूणाचलम्नेच गालबोट लावलेले असते. अरूणाचलम् निर्लज्जपणे दुस-या दिवशी गद्रेंना शांत करण्यासाठी पगार वाढ करतो. पण हा अधिकारी अपमान सहन न होऊन राजीनामा देतो. अरूणाचलम्चे हे प्रकार वाढतच जातात.

अरूणाचलम्ला गद्रेच्या पत्नीशी गैरवर्तणूक केली म्हणून पोंक्षे साहेब त्याला जाब विचारू शकत नाहीत. त्याला कारण म्हणजे अरूणाचलम्चे लग्न आर्थिक फायद्यासाठी दोघांच्या मनाविरूद्ध झालेले असते. धंद्यात अरूणाचलम्च्या सास-याची पार्टनरशीप असते त्यामुळे घटस्फोटही देता येत नाही. त्यामुळे अरूणाचलम् विरूद्ध कारवाई करण्यास पोंक्षे साहेब असमर्थता दाखवतात. पोंक्षे साहेब 'मॅनेजमेंट फिलॉसॉफी' राबवण्याचे ठरवतात. तरीपण अरूणाचलमला शिक्षा करीत नाहीत. म्हणून देशमुख व्यथित होतात. त्यांच्या पराभवाची चिन्हे दिसू लागतात.

कंपनीचा विकास सुरूच असतो. देशमुखही कामात व्यस्त असतात. अरूणाचलम देशमुखांची पी.ए.मिसेस सारिका गांधीकडे येता जाता वासनासक्त दृष्टीने बघत असतो. तिला स्वतःची पी.ए.म्हणून घेण्याचा तो प्रयत्न करतो. अरूणाचलम्च्या युनिटमध्ये कामगार पगारवाढीसाठी आंदोलन करतात. अरूणाचलम् कामगार नेत्यांशी उद्ध्टपणे वागतो. देशमुख सामोपचाराने कामगारांचे प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न करण्यास सांगतात पण अरूणाचलम् त्यांचे म्हणणे ऐकत नाही. सारिका गांधीची बदली अरूणाचलम् आपल्याकडे करून घेतो. अरूणाचलम् स्वतःच्या फ्लॅटवर पार्टी देतो. त्यामागे त्याचा चांगला उद्देश नसतो. स्वतःच्या वासनापूर्तीसाठी सारिका गांधीलाही आग्रहाने बोलावून घेतो. देशमुख व इतर सहकारी पार्टीत असतांना अरूणाचलम् तिच्याशी असभ्य वर्तन करतो त्याचवेळी तिच्यातली स्त्री जागी होते व प्रतिकार करून त्याला अपशब्द बोलून निघून जाते. देशमुखांना अरूणाचलम्च्या या वर्तनाचा खुपच राग येतो. पण तो त्यांना व्यक्त करता येत नाही.

अपमानित झाल्यामुळे गांधींना कामावरून काढून टाकावे या हेतूने अरूणाचलम देशमुखांची आपल्या विभागात बदली करून घेतो. अरूणाचलम् आता देशमुखांचा वरिष्ठ असतो. त्यामुळे अरूणाचलम् देशमुखांना गांधी विरूद्ध रिपोर्ट तयार करण्यास सांगतो. परंतु देशमुखांच्या मॅनेजमेंट फिलॉसॉफीच्या तत्त्वात खोटा रिपोर्ट तयार करणे बसत नाही. त्यामुळे ते स्पष्टपणे नकार देतात. त्यामुळे देशमुखांनाच सस्पेंड करण्यात येते. दरम्यान अरूणाचलम् अधिकच हिंस्त्र बनलेला असतो. त्याच्या पत्नीने विषप्राशन केल्यानंतर तिला दवाखान्यात न नेता थोडीशी धुगधुगी असतांनाच तिचा गळा दाबून खुन करतो व पत्नीने आत्महत्या केली असे जाहीर करतो. पत्नीच्या खुनानंतर तो लगेच गांधीशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न करतो. यावरून असे दिसते की, अरूणाचलम् शारिरीक सुखासाठी कोणत्याही स्तरापर्यंत जाण्यास तयार होऊ शकतो.

अरूणाचलम्मुळे देशमुखांना त्यांची 'मॅनेजमेंट फिलॉसॉफी' वापरता येत नाही. पोंक्षे साहेबांची मॅनेजमेंट फिलॉसॉफी आणण्याची इच्छा असते पण स्वतःच्या मुलाच्या बदफैली वर्तणुकीस आळा घालता येत नसल्याने शेवटी देशमुखांना कामावरून कमी करण्यात येते.

अशाप्रकारे सामान्य व्यक्तींच्या विचारांना आर्थिक हितसंबंधांमुळे व वरिष्ठांच्या मनमानी कारभारामुळे शेवटी पराभवच स्वीकारावा लागतो.

मार्केट

'मार्केट' या **1988** साली लिहिलेल्या कादंबरीत पैसा कमावण्याच्या धडपडीत लयास जाणारी जीवनमूल्ये आणि रक्ताच्या नात्याचा स्वार्थासाठी व्यापार कसा केला जातो याचे मर्मभेदक चित्रण करणारी कादंबरी संवेदनशील मनाला विचार कारायला लावते.

एस.के.केळकर हा मार्केटिंग मॅनेजर असून तो संस्कृतत्त्या तत्वनिष्ठ प्राध्यापकाचा मुलगा तर सर्वोदय चळवळीतल्या तात्यांचा जावई आहे. सुसंस्कृत घराण्याची पार्श्वभूमी असूनही भौतिक सुखासाठी आपली नीतीमत्ता गहाण ठेवणारा केळकर अतिशय महत्त्वाकांक्षी आहे. पेशव्यांच्या काळापासूनचा वाडा अधिक पैसा कमवण्याच्या उद्येशाने विकून टाकतो. लहान दोन भावांना थोडे पैसे देतो. वडिलांना आपल्याकडे ठेवतो. त्यातही त्याचा स्वार्थ असतो. वडिलांच्या वाटयाचे पैसे त्याने फ्लॅटमध्ये गुंतवलेले असतात. मरेपर्यंत वडिलांना स्वतःकडे ठेवल्यास तो फ्लॅटही त्यालाच मिळणार असतो. त्याचबरोबर वाडयाच्या विक्रीतही त्याने गैरव्यवहार केलेला असतो. त्यामुळे त्याचे भाऊ त्याला वाडयाच्या पैशाबद्दल विचारतात. त्याच्यावर पैसे खाल्याचा आरोप करत असतात. केळकर हे सर्व धंदे पैसे कमावण्याच्या उद्येशानेच करत असतो.

आपल्या कंपनीचा निकृष्ट माल खपवताना केळकर अनीतीचा मार्ग वापरतो. दिवाळीची भेट म्हणून एका कंपनीत कामगारांना सुटकेस वाटण्यात येणार असतात. सुटकेस वाटण्याची कल्पना केळकरचीच असते. तिथल्या एका अधिका-याला हा माल निकृष्ट असल्याची कल्पना येते. त्यावेळी केळकर त्याला लाच देऊन माल घेण्यास प्रवृत्त करतो. मालकाला खुष करण्यासाठी मालकाचाच पैसा आहुजा या अधिका-याला तो देतो. या आहुजाला पुढे गैरव्यवहार केला म्हणून कामावरून कमी करण्यात येते. शेवटी केळकरमुळे आहुजाचा बळी जातो.

केळकरचे सासरे तात्या अतिशय तत्त्वनिष्ठ असतात. सर्वोदय चळवळीत विनोबांबरोबर त्यांनी काम केलेले असते. त्याच शहराजवळ तात्यांनी जमीन घेऊन गीताई आश्रम स्थापन केलेला असतो. त्या आश्रमाच्या जागेवर तोडकर नावाच्या बिल्डरला इमारत उभी करावयाचा असते. तोडकर केळकरांच्या मार्फत ती जागा विकत घेण्याचा प्रयत्न करतात. पण तात्या हे त्या आश्रमात स्वतःपुरते अन्नाचे उत्पादन घेऊन जगत असतात. त्यांना जागा सरकारला अर्पण करायची असते. त्यांच्या मुलाला त्यांची तत्त्वं पटत नाहीत. त्यामुळे तो त्याच शहरात गरीबीत दिवस काढत असतो. केळकरला त्या जागेचा व्यवहार केल्यास काही पैसे तोडकरकडून मिळणारी असतात. त्यामुळे केळकर आपल्या पत्नीमार्फत जागा विकण्याच्या प्रयत्नात असतात. ती तसा प्रयत्नही करते. पण तात्या तयार होत नाहीत. तात्या एकटेच रहात असल्यामुळे त्यांच्या आश्रमातील फळे चोरीला जात असतात. गावातील गुंडगिरी करणारा अर्जुन त्यांना मारहाण करून फळे चोरतो. त्यामुळे ते आजारी पडतात. केळकरची पत्नी जागेच्या व्यवहारासाठी तात्यांना भेटायला जाते. तेव्हा हतबल झालेले तात्या जागा विकण्यास तयार होतात. तोडकर व केळकर पत्नीसह दुस-या दिवशी खरेदीचे कागदपत्र घेऊन जातात. तेव्हा तात्या आपला निर्णय बदलतात. आश्रम राष्ट्राला अर्पण करण्याबद्दलचे कागदपत्रे आदल्या दिवशीच तयार केलेले आहेत असे ते सांगतात. तात्यांच्या मुलालाही केळकरांनी बरोबर आणलेले असते. केळकरांचा डाव त्यांच्या लक्षात त्याचवेळी येतो. केळकरांच्या पत्नीने पैशाच्या लोभाने केलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरतात. तात्यांचा मुलगा जबरदस्तीने मृत्युपत्र बदलून टाकतो. सर्व जमीन आपल्या नावावर करून तोडकरबरोबर बिल्डिंग उभी करण्याचा प्रयत्न करतो. तात्यांच्या मृत्युच्या वेळीही तो केळकरांच्या पत्नीला म्हणजे स्वतःच्या बहिणीला निर्दयीपणे बोलतो.

केळकरांची पत्नी ही बँकेत मुख्य अधिका-याची सहाय्यक म्हणून काम करत असते. तिच्या सौंदर्यामुळे तिचे अधिकारी तिच्यावर खुश असतात. तेही भ्रष्टाचाराने अनेक कर्ज मंजूर करत असतात. म्हणून केळकरांच्या पत्नीमार्फत तोडकर मित्राचे कर्ज प्रकरण पास करण्यासाठी प्रयत्न करतो. ती त्यास तयार होत नसते परंतु पैशाचे आमिष दाखवल्यावर केळकरची पत्नी या अधिका-याला आपले स्तन दाखवते व तोही अभिलाषेपायी प्रकरण पास करून देतो. केळकर पैसे कमावण्यासाठी आपल्या पत्नीचाही वापर करून घेतो. पैशाचा लोभ तिलाही सुटत नसतो.

केळकरांची मुलगी तनुजा सुसंस्कृत, हुशार व सुंदर आहे. तनुजाही दिवाणांच्या फर्ममध्ये त्यांचीच सहाय्यक म्हणून काम करत असते. तिच्या सौंदर्यावर तेही खुष असतात. पण तनुजा कोणत्याही लोभास बळी पडणारी नसते. केळकर तनुजाचा वापर पैसे कमावण्यासाठी करतो. आहुजाला खुष करण्यासाठी तनुजाला पार्टीत घेऊन जातो. आहुजा दारूच्या नशेत असतांना तिच्या अंगावर मुद्दामहून पडतो. त्यावेळीही केळकर काहीच बोलत नाही. या कृतीचा तनुजाला राग आलेला असतो. केळकरच्या कंपनीतला माल खपत नाही म्हणून केळकरला जबाबदार धरण्यात येईल अशी त्याच्या मालकाकडून पूर्व

सूचना मिळते.त्यामुळे अधिक माल खपवण्यासाठी तनुजाच्या मालकाला तनुजाची ओळख सांगून सुटकेस विकतो.तिचे मालक तनुजावर खुश असतात.त्यामागे त्यांची वासना दडलेली असते.

तनुजाला तिचा मालक कंपनीच्या कामानिमित्ताने दिल्लीला घेऊन जातो व तिच्यावर बलात्कार करतो. त्यामुळे तनुजा घाबरून जाते.दवाखान्यात दाखल करण्यास हॉटेलची एक महिला कर्मचारी मदत करते.तनुजाचा मालक दिल्लीवरून आपल्या पर्सनल मॅनेजरला फोन करून तिला कामावरून काढून टाकण्याची नोटीस देण्यास सांगतो.आपल्या विरूद्धचा पुरावा नष्ट व्हावा म्हणून रात्री बारा वाजता मॅनेजरला आदल्या दिवशीची तारीख टाकून कामात कुचराई केल्यामुळे व दिल्लीला येऊनही मित्राबरोबर मजा मारायला गेली असे कारण दाखवून नोटीस घरी द्यायला सांगतात.

दुस-या दिवशी दवाखान्यातल्या डॉक्टरांमार्फत तनुजा आपल्या घरी फोन करते.केळकर दिल्लीला गेल्यावर डॉक्टरीणबाई पोलिसांत तक्रार करण्यास सुचवतात.पण केळकर तयार होत नाहीत.कारण दिवाणकडून मालाची ऑर्डर घ्यावयाची असते.त्यामुळे तनुजाने कितीही संताप करून सांगितले तरी ते तक्रार करण्यास टाळाटाळ करतात. रक्ताच्या नात्याचा त्यांना विसर पडतो.फक्त भौतिक सुखाच्या मागे लागलेल्या केळकरांना मुलीचे दुःखही समजत नाही. दिवाण साहेबांना भेटण्यास गेल्यावर वाजवीपेक्षा जास्त किंमतीत माल विकत घेण्यास ते तयार होतात.त्या स्वतः केळकरला तीन लाखांचा वैयक्तिक फायदा होणार असतो.हे पत्नीला सांगताना तनुजा ऐकते.आपल्यावर झालेल्या बलात्काराचे, अन्यायाचे दुःख सहन न झाल्याने ती आत्महत्या करते.तिच्या आत्महत्येनंतर केळकर दिवाणांना भेटल्यावर कोर्टात खेचण्याची भाषा करतो.दिवाण स्वार्थीपणे मुलीची किंमत एक लाख रूपये देण्यास तयार होतात.त्याचबरोबर कंपनीत चांगला जॉब देण्याचेही आश्वासन देतात.त्यामुळे आनंदाने घरी आल्यावर पतीपत्नी मिळून दारू पीत बसतात.केळकर पत्नीला सर्व वृत्तांत सांगतो.तीही नशेत एका लाखातले पन्नास हजार रूपये मागते.कारण तनुजा तिचीही मुलगी असल्याने पन्नास हजारावर आपला हक्क आहे असे सांगते.

पैशाच्या हव्यासापोटी स्वतःच्या मुलीचाही वापर अनैतिक मार्गासाठी कसा केला जातो, याचे विदारक चित्रण करताना चंगळवादी समाजाचे वास्तव स्वरूप येथे प्रकट केलेले आहे.

### मराठेंच्या कादंबरीतील सामाजिकता.

स्वातंत्र्यानंतर खेडयातील समाज उद्योगधंद्याच्या शोधात महानगराकडे जाऊ लागला.नागरी समाज व ग्रामीण समाज यांच्यातून मिश्र संस्कृती या महानगरात उदयाला आली.साहजिकच या बदलत्या जीवनाचा संवेदनशील मनावर आघात झाला.साहित्य क्षेत्रात मर्ढेकरांपासून महानगरीय जीवन रेखाटायला सुरूवात झाली.परंतु महानगरीय जीवनाच्या वास्तव स्वरूपाचा वेध **1960** नंतरच्या साहित्यात मोठया प्रमाणात घेतला गेला आहे.त्याचा विकास भाऊ पाध्ये, जयवंत दळवी, मधु मंगेश कर्णिक, अरूण साधू यांच्या साहित्यातून झाला असल्याचे दिसते.**1960** नंतरच्या कादंबरी वाङ्मयातून प्रकटणा-या वास्तवासंबंधी डॉ.नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "**1960** नंतर ग्रामीण-शहरी संपर्कातून, यांत्रिकतेच्या ग्रामीण जीवनावरल्या आक्रमणातून जसे एक सामाजिक वास्तव आकाराला आले, त्या प्रमाणेच नागर जीवनातही बदल झाले.हे बदल प्रामुख्याने औद्योगिकरणामुळे झाले.औद्योगिक संस्कृतीची चाहूल तशी **1945** नंतरच्या मराठी साहित्यात येऊ लागली होती.परंतु कादंबरीमध्ये जोरकसपणे होऊ लागला तो **1960** नंतरच्या काळातच".[3] साठोत्तरी कादंबरी वाङ्मयाचा अभ्यास केल्यावर डॉ.कोत्तापल्ले यांच्या मताची प्रतीती येते.याच कालखंडात ह.मो.मराठे नागर जीवनातील वेध वेगळया अंगाने घेताना दिसतात.त्यांच्या नागरी जीवनावरच्या कादंब-यांतून कामगार-व्यवस्थापक, पत्रकार, संपादक, स्त्रिया आणि पुरूषप्रधान समाजव्यवस्था यांच्यातील संघर्ष दिसतो.त्यांच्या कादंबरीतील समाजचित्रण कशा प्रकारचे आहे ते आपण पाहू.

### मध्यमवर्गीयांचे जीवनचित्रण

ह.मो.मराठेंच्या कादंब-यांतून येणारा मध्यमवर्ग हा सामाजिक जाणीव असलेला बुद्धीजीवी वर्ग आहे.हा बुद्धीजीवी वर्ग समाजात आपले स्थान टिकवून ठेवण्यासाठी सतत संघर्ष करताना दिसतो.स्वातंत्र्य प्राप्तीनंतर समाजात आर्थिक, राजकीय, सामाजिक उलाढाली झाल्या.शिक्षणाचा प्रसार झाल्याने नवशिक्षित तरूण औद्योगिक क्षेत्रात आपल्या जीवन जाणीवा ठेऊन काम करू लागला.आपल्या गुणवत्तेवर अधिकारी पद भूषवू लागले पण त्यांच्या सामाजिक जाणीवांची कोंडी मालक-व्यवस्थापकामुळे होत गेली.हा मध्यमवर्ग त्यासाठी संघर्ष करू लागला.स्वतःची गुणवत्ता सिद्ध करू लागला.मध्यमवर्गीय समाजाबद्दल रा.ग.जाधव म्हणतात, "गुणवत्तेची कदर करणारे गुणवत्तेच्या आधारे जीवन व्यवसाय करणारे गुणवत्तेच्या निकषावर स्वतःची प्रगती करू पाहणारे आणि गुणवत्तेशिवाय आयुष्यात इतर कसलेही फार मोठे जगण्याचे, झगडण्याचे आणि पुढे जाण्याचे साधन नसलेले लोक मध्यम वर्गात मोडतात".[4] हा मध्यमवर्ग समाजाशी संघर्ष करतो परंतु त्याला सतत अपयशाला सामोरे जावे लागते.या मध्यमवर्गाला जीवनविषयक तत्त्वज्ञानाची चांगली जाण आहे.बदलत्या संस्कृतीचे भान, जीवनमूल्यांचा आदर करण्याची वृत्ती, जुन्या-नव्याचा सापेक्ष विचार करण्याची प्रवृत्ती, आधुनिकतेला आदर्श तत्त्वज्ञानाची जोड देण्याची क्षमता या मध्यमवर्गाजवळ आहे.मराठेंनी शहरी संस्कृतीचे चित्रण करतांना मध्यमवर्गीय जीवन, नवश्रीमंत वर्गाचा चंगळवाद, व्यवस्थापकीय जीवनातील संघर्ष यांचे चांगले चित्रण केले आहे.त्यांच्या कथा-कादंब-यांतून औद्योगिक जगतातील जीवनमूल्यांची होणारी घसरण, कामगार व अधिकारी व मालक वर्गाचे चांगले जीवन चित्रण ठळकरीत्या रेखाटले आहे.

'इतिवृत्त' व 'प्रास्ताविक' य दोन कादंब-यांतून संपादकीय जीवनातील संघर्ष येतो. 'इतिवृत्त'मध्ये समाजात चाललेली गुंडगिरी,मुख्यमंत्र्यांचा भ्रष्टाचात, औद्योगिकरणामुळे होणारे प्रदूषण ह्या विरूद्ध संपादकाची लेखणी आवाज उठवते.ही लेखणी समाजाला संघर्ष करायला प्रवृत्त करते.त्यांनी मुख्यमंत्र्यांविरूद्धच बंड केल्याने त्याच्यावर अनेक प्रकारे दबाव येतात.मध्यम वर्गाबद्दलची जाणीव य ठिकाणी व्यक्त होते.हॉटेल कामगार, पत्रकारांवर होणारा हल्ला, प्रदुषणामुळे आजारी पडणारी माणसे याबद्दल लेखक वर्तमानपत्रातून बंड करतात.ह्या संपादकाला समाजपरिवर्तन घडवायचे आहे पण राजकीय हस्तक्षेप त्याला विरोध करतो.एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेला संपादक समाजाबद्दल आपल्या जीवन जाणीवा ठेवून लेखन करणारा आहे.त्याच्यावर भांडवलदार वर्गाकडून अन्याय होताना दिसतो.

'प्रास्ताविक' नायकालाही समाजाचे भान आहे. तो आपले अस्तित्व टिकवण्यासाठी सतत धडपडत आहे. त्याला रोज अनेक प्रकारची माणसे भेटतात. त्याला नोकरी टिकवण्यासाठी वरिष्ठांचा अनेकदा रोष ओढवून घ्यावा लागतो. तो ज्या समाजात राहतो तोच समाज त्याला झुलवत ठेवतो. त्याच्या धडपडीची जाणीव कुणालाच होत नाही. याबद्दल दीपक घारे म्हणतात – "झोपडीत किंवा ब्लॉकमध्ये राहणारा समाज जगण्यासाठीच रोज संघर्ष करत असतो. दोघांची असुरक्षिततेची भावना सारखीच तीव्र असते. संपन्नतेच्या बुरख्याखाली वावरणा-या मध्यमवर्गाचं आयुष्य आतून या झोपडपट्टीसारखं बकाल होत चालल्याची जाणीव ही कादंबरी वाचल्यावर होते."[5] दीपक घारे याचे विधान सार्थ ठरते. कारण शहरात राहणारा मध्यमवर्ग नेहमीच ताण-ताणावाखाली जगत असतो. राहण्याच्या जागेचे प्रश्न, काम करीत असलेल्या ठिकाणी असुरक्षितता, गुंडगिरी, सामाजिक जाणिवा नसलेला समाजाबरोबर त्याला नेहमीच संघर्ष करावा लागतो. कुटुंबातील विविध समस्या, मुलांची शाळा प्रवेशाच्या समस्या ह्या त्याच्या रोजच्या जीवनात घडणा-या समस्या आहेत. दररोज संघर्ष करूनही यश येईलच याची खात्री नसते. यामुळे त्याला भ्रमावस्था प्राप्त होत असल्याचे दिसते.

उद्योगसमूहात कामगार, अधिकारी मालक यांच्यातले संबंध हे सलोख्याचे असावेत. सामाजिक जणिवेतून कामगारांच्या व समाजाच्या हितासाठी वेगवेगळया योजना जाहीर कराव्यात, त्यासाठी मालकवर्गाने सामाजिक बांधिलकी बाळगावी असा दृष्टीकोन 'सॉफ्टवेअर' मध्ये दिसतो. भांडवलदारांचा वर्ग ह्या मध्यमवर्गाची पिळवणूक करीत असतो. मध्यमवर्गातल्या अधिकारी वर्गाला नेहमीच असुक्षिततेची भीती असते. त्याला नोकरीत कोणतीही सुरक्षितता नसते. कामगारवर्गाला संघटनेचे पाठबळ लाभत असते. पण ह्या वरिष्ठ पदावर काम करणा-याला नेहमीच नोकरी टिकवण्यासाठी संघर्षाला सामोरे जावे लागते. 'सॉफ्टवेअर' मध्ये देशमुखांच्या उदात्त दृष्टोकोनाला अर्थवाही समाजव्यवस्थेत कोणतेच स्थान मिळत नाही. त्याचा उदात्त दृष्टीकोन भांडवलदार वर्गा च्या आड येत असल्यामुळे त्याला नेकरीतून कमी करण्यात येते. हा अन्याय करताना वेगवेगळे मार्ग अवलंबले जाताना दिसतात. यातून सामजिक नीतीमूल्यांची होणारी घसरण दिसते. भावनिक संघर्षही लेखक ठिकठिकाणी व्यक्त करतो.

औद्योगिक जगतातल्या मध्यमवर्गीय स्त्रियांची पिळवणूक कशाप्रकारे केली जाते याचा वेध मराठे घेताना दिसतात. या मध्यमवर्गीय स्त्रीकडे अधिकारी, कामगार किंवा सहकारी वासनेच्या दृष्टीकोनातून पाहत असतात. त्यात त्यांना आपले अस्तित्व टिकवण्यासाठी वेळोवेळी संघर्ष करावा लागतो. त्यांच्या अन्यायाला बळी पडावे लागते. 'सॉफ्टवेअर' मध्ये ह्या अन्यायग्रस्त स्त्री वर्गाचा वेध चांगल्या प्रकारे घेतला आहे तर 'मार्केट' मध्ये बॉसच्या वासनेची बळी पडलेली तनुजा दिसते. तिला शेवटी आत्महत्या करावी लागते. 'सॉफ्टवेअर' मधली देशमुखांची मुलगी प्रेमाच्या जाळयात सापडून तिच्या मित्राकडून वेळोवेळी होणा-या शारीरिक संबंधामुळे गर्भपात करून घेते. समाजात चाललेल्या अनैतिक मार्गाला, फसवेगिरीला हा मध्यमवर्ग सतत बळी पडत असल्याचे दिसते. मध्यमवर्गातील स्त्री ही सतत कामाच्या मानसिक तणावाखाली असते. संसाराला आपलाही हातभार लागावा ह्या भावनेने छोटे-मोठे उद्योगधंदे करावेत असे तिला वाटत असते. पण हा लघुउद्योग केला तरी प्रतिष्ठीत कंपन्यांच्या भूल घालणा-या मालाच्या जाहिरातीमुळे तिच्या लघुउद्योगावर परिणाम होत असतो. त्यात ती फसवलीही जाते. मराठे 'सॉफ्टवेअर' मध्ये देशमुखांच्या पत्नीच्या व्यक्तिरेखेव्दारे या मध्यमवर्गीय स्त्रीचा वेध घेतात. स्वतःचा संसार सांभाळत असताना ऑफिसमधल्या कामगार कपातीची भीती असणारी 'प्रास्ताविक' मधली नायिका दिसते. कामगार कपातीची वेळ आपल्यावर येऊ नये या चिंतेत असणारी स्त्री ही मध्यमवर्गातल्या समाजात दिसते. या मध्यमवर्गीय जीवनाचे चित्रण करताना मराठे त्यांच्या छोटया मोठया समस्यांचे प्रश्न समाजासमोर मांडतात. त्याचबरोबर पैसा कमावण्यासाठी आपल्या सौंदर्याचा, शरीराचा उपयोग करून घेणारी 'मार्केट' मधली स्त्री दिसते. समाजात भौतिक सुखासाठी वाममार्गाला लागलेल्या स्त्रिया आढळून येतात. त्याचा मराठे मार्मिकपणे वेध घेताना दिसतात.

एकंदर मध्यमवर्गीय समाजाला भांडवलशाही समाजात स्थान नाही. त्यांच्या विचारांचा, गुणवत्तेचा वापर फक्त अर्थार्जनासाठी केला जातो असे दिसते. संपादकपद सांभाळताना औद्योगिक क्षेत्राशी त्यांचा जवळून संबंध आला होता. तत्कालीन कालखंडात समाजावर होणा-या अन्यायाचे त्यांनी जवळून अनुभव घेतले होते. त्यामुळे कथा-कादंब-यांतून लेखक मध्यमवर्गीयांचे जीवन वास्तव स्वरूपात मांडतात. त्याला मनोरंजनाचे स्वरूप काही ठिकाणी प्राप्त होत जाते. पण वास्तव स्वरूप रेखाटताना मनोरंजक घटना-प्रसंगांव्दारे मांडाव्या लागतात. त्यामुळे ही त्यांच्या लेखनाची मर्यादा ठरते. बदलता मध्यमवर्गीय समाज, त्याची भौतिक सुखासाठी चाललेली धडपड, कामगार-अधिकारी यांच्यातील संघर्ष असे विविध प्रश्न श्री. मराठे यांनी हाताळलेले आहेत. समाजातील या वास्तवाला त्यांनी बोलके करण्याचा प्रयत्न केला आहे.

## शहरी जीवनातील वास्तवता

ह.मो.मराठे बदलत्या समाजव्यवस्थेचा वेध घेतांना आजचा मध्यमवर्ग भोगवादाकडे जात असल्याचे दाखवतात. केवळ पैसा कमावणे हा त्यांचा उद्देश असल्याने जीवन मूल्यांचा -हास होत असल्याचा प्रत्यय येतो. नागरी वास्तव स्वरूपाचे लेखन करताना मराठेंची लेखणी अधिक तीव्र होत जाते. त्यांच्या कादंबरीमध्ये भोगवादी संस्कृतीचा ठिकठिकाणी प्रत्यय येतो. उच्च वर्गाच्या पावलावर पाऊल टाकत असताना स्वतःची जीवनमूल्ये पायदळी तुडविली जात असताना त्यात भावनांना स्थान दिसत नाही.

'मार्केट' सारख्या कादंबरीत आपल्या रक्ताच्या नात्याचा विसर पडला असल्याचे दिसते. हा नायक केवळ पैसे कमावताना मुलीचा, पत्नीचा बाजार मांडतो. यामागे कारणेही तशीच आहेत. अर्थव्यवस्थेमुळे उच्च स्वप्न पाहण्याच्या धडपडीत तो स्वतःच्या भावनाही विसरतो. याबद्दल नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात – "औद्योगिकीकरणाचा, अर्थव्यवस्थेच्या रेटयाचा आणखी एक परिणाम म्हणजे प्रत्येक वस्तू विक्रेय अशीच वाटत राहते. किंबहुना भोगवाद हाच महत्त्वाचा होऊन जातो. या भोगवादी संस्कृतीचे फार कमी प्रमाणात का होईना, मराठी कादंबरीमध्ये चित्रण उमटलेले आहेत. सुभाष भेंडे यांच्या 'अंधारवाटा' आणि ह.मो.मराठे यांच्या 'सॉफ्टवेअर' मध्ये या मूल्यहीन चंगळवादी संस्कृतीचा प्रत्यय लेखक चांगल्या रीतीने प्रकट करतात"[6]. 'माकेट' मध्ये भोगवादी संस्कृतीचा प्रत्यय येत असला तरी थोडीशी रंजकताही दिसते. ही रंजकता वास्तवातून आलेली असल्याने कोत्तापल्लेंचे मत योग्य वाटते.

औद्योगिक क्षेत्रातल्या स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टीकोन लेखकाने चांगल्याप्रकारे रेखाटला आहे. अधिकारी वर्ग हा ह्या स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून पाहतो. स्वतःच्या पत्नीचा खुन करून तिच्यापासून सुटका करून घेणारा अरूणाचलम 'सॉफ्टवेअर' मध्ये दिसतो. त्याचा आपल्या कंपनीतल्या स्त्रीवर्गाकडे पाहण्याचा दृष्टीकोन वासनेने बरबटलेला आहे. 'मार्केट' मध्येही हीच वास्तवता दिसते. मालकाची स्त्रीकडे पाहण्याची वासनासक्त नजर येथेही दिसते. त्यातून बलात्कारही केला जात असल्याचे वास्तव चित्रण मराठे रेखाटतात.

कामगार-अधिकारी यांच्याकडे माणूसकीच्या भावनेतून पाहिले जात नाही, त्यांच्यावर सतत अन्याय होत असल्याचे दिसते, कामगार वर्गाचा संप हे औद्योगिक जीवनातले नेहमीचे प्रसंग आहेत. त्यातून कामगार वर्गावर होणारा अन्याय, त्यांची फसवणूक अधिका-यांकडून केली जाते. ('मार्केट') लाच घेऊन कमी प्रतीचा माल खपवला जातो. नागरी जीवनाचा संप, मोर्चे हा भागच होऊन जातो.

समाजात चालत असलेली गुंडगिरी, दहशत हे नागरी जीवनात नेहमीच आढळते. 'इतिवृत्त' मध्ये संपादकाला नेहमीच या गुंडगिरी, समाजात चालत असलेला भ्रष्टाचार, बालकामगारांची होणारी पिळवणूक ह्या विरूद्ध आवाज उठवावा लागतो. संपादकाची लेखणी बंद करण्यासाठी अनैतिक मार्गाचा वापर केला जातो. मराठे आपल्या कादंबरीमध्ये अशा प्रकारचे ताणतणाव रेखाटताना त्याला वास्तव रूप देतात. स्वतः लेखक या क्षेत्रात असल्याने ते समाजातील वास्तवतेला अधिक प्रखर करत जातात.

शहरी संस्कृतीचा वेध घेताना मराठे यांनी सूक्ष्म निरीक्षण केले आहे. अधिकारी, मालक हा नेहमीच व्यसनांच्या आहारी जाताना दिसतो. दारू, सिगारेट या व्यसनांचा बहुतेक ठिकाणी प्रत्यय येताना दिसतो. मालक वर्गाचे अलिशान राहणे, कामगार वर्गाबद्दल आस्था न बाळगता त्यांच्यावर अन्याय करणे याचे वास्तव चित्रण 'सॉफ्टवेअर' मध्ये येते.

औद्योगिक क्षेत्रातल्या कामगारांना संघटनेमार्फत न्याय मिळवता येतो पण अधिका-यांना अशाप्रकारचे संरक्षण नसते. वरिष्ठांशी संघर्ष झाल्याने अधिका-यांना कामावरून कमी करण्यात येते. अन्यायाविरूद्ध दाद मागता येत नाही. 'सॉफ्टवेअर' मध्ये याचे अतिशय प्रत्ययकारी चित्रण आलेले आहे. अधिका-याची होणारी मानसिक कुचंबणा मराठेंनी चांगल्या प्रकारे रेखाटली आहे.

संघर्ष, ताणतणाव या कादंब-यांमध्ये जागोजागी आढळून येते. मराठेंच्या कादंब-यांतला नायक कर्तव्यासाठी धडपडत असणारा दिसतो. कर्त व्यासाठी धडपडत असताना त्याला असुरक्षित जीवन जगावे लागते. नेहमीच संघर्ष व ताणतणाव यांमुळे कुटुंबाकडेही लक्ष दयायला त्याला वेळ मिळत नाही. कुटुंबाची त्यामुळे ओढाताण होते. याचे वास्तव चित्रण 'इतिवृत्त' मध्ये दिसते.

शहरी जीवनातील स्त्री सुद्धा नेहमी धडपडणारी असते. पतीच्या पावलावर पाऊल टाकत असताना लघु उद्योग धंदा, नोकरी करणारी स्त्री दिसते. स्पर्धेच्या युगात तिच्या लघु उद्योगातील उत्पन्नाला मागणीच राहत नाही. त्यामुळे दुःखीकष्टी होणारी स्त्री मराठेंनी रेखाटली आहे. (सॉफ्टवेअर) स्त्रियांची होणारी मानसिक कुचंबणा आजच्या बदलत्या आर्थिक हितसंबंधांमुळे होते. आर्थिक हितसंबंधांमुळे झालेल्या विवाहामुळे स्त्रीची कोंडी होते. नव-याकडून होणारा अन्याय सहन न झाल्यामुळे आत्महत्येस प्रवृत्त व्हावे लागते याचा प्रत्यय 'सॉफ्टवेअर' या कादंबरीत येतो. झोपडपट्टी नागरीजीवनात संघर्षाला कारणीभूत ठरते. झोपडपट्टीतील बकाल जीवन, त्यामुळे अस्वस्थ होणारा फ्लॅट संस्कृतीतला माणूस, त्यातून निर्माण होणारे संघर्ष 'इतिवृत्त' मध्ये दिसतात. नागरी जीवनात असलेल्या समस्या मराठे रेखाटताना दिसतात.

आपली नोकरी टिकवण्यासाठी सतत धावपळ करावी लागणे, मालकाला खुष करण्यासाठी करावे लागणारे संघर्ष, धावपळीत स्वतःलाच त्यात झोकून देणे, सहका-यांची असहकार्याची भावना घरात पत्नीशी होणारे वाद, झोपडपट्टीचे प्रश्न इत्यादींमुळे त्याच्यावर सतत ताण येणे , परिणामी वरिष्ठांचे ओरडणे अशाप्रकारचा जीवन संघर्ष त्याला करावा लागतो. याचा प्रत्यय 'प्रास्ताविक' मध्ये येतो. शहरी माणसालाही ह्या प्रकारच्या समस्यांना नेहमीच सामोरे जावे लागते. मध्यमवर्गीय माणसाची जगण्यासाठी चाललेली धडपड रेखाटताना समकालीन, राजकीय, सामजिक प्रश्नांना ते महत्व देतात. बिहारमध्ये चालू असलेल्या भ्रष्टाचार विरोधी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलन छेडण्याचा प्रयत्न संपादक करतात. या संपादकाच्या तळमळीमुळे त्याला समाजातल्या सर्वच वर्गातून पाठिंबा मिळत असतो. त्याने हाताळलेला प्रदुषणाचा प्रश्न हा आजसुद्धा आपल्याला दिसून येतो. कारखानदार त्याविरूद्ध काहीही उपाययोजना करायला तयार नाहीत. हॉटेल कामगारांचा प्रश्न आजही अस्तित्त्वात आहे. राजकीय व्यक्तींचे भ्रष्टाचार आजही ऐकायला मिळतात. त्यामुळे मराठेंनी आजच्या वास्तव प्रश्नांना आपल्या कादंब-यांमध्ये स्थान दिलेले दिसते.

ह.मो.मराठे यांनी शहरी जीवनाचे चित्रण करताना शहरी संस्कृती, शहरी भाषा, त्यांचे जीवन खूपच चांगल्या प्रकारे रेखाटली आहेत. औद्योगिक जगतातील मालक, अधिकारी यांची नावे सुद्धा शहरी संस्कृतीला शोभतील अशाच प्रकारची आहेत. उदा. बी-**13/14** मधील जयू, सी-**27** मधले पै, ए-**4** मधले पेंडसे, व्ही.एस. (व्ही.एस.देशमुख), एस.बी. (पोंक्षे) अशी नावे आढळून येतात.

ह.मो.मराठे हे पत्रकारितेच्या व्यवसायात असल्याने नागरी जीवनाचा त्यांना चांगला परिचय आहे. बारीकसारीक तपशीलही त्यांच्या लेखनात आढळून येतात. सामाजिक वास्तव रेखाटताना याचा त्यांना चांगला उपयोग होताना दिसतो. त्यांच्या कादंबरीतील सामाजिकतेबद्दल दिगंबर पाध्ये म्हणतात - "या कादंब-या समकालीन सामाजिक, राजकीय प्रश्नांना महत्व देणा-या असल्याने वर्तमानपत्री कादंबरीशी नाते सांगत असणा-या वाटल्या. तरी सामाजिकतेकडे दुर्लक्ष करण्याची त्यांची प्रवृत्ती नसल्याने त्या या नमुन्यात पूर्णपणे समाविष्ट होत नाहीत" . जीवनातील समाज वास्तवता या कादंब-या प्रकट असल्याचे दिगंबर पाध्ये यांच्या वक्तव्यातून लक्षात येते.

ह.मो.मराठे यांनी 'इतिवृत्त', 'प्रास्ताविक', 'सॉफ्टवेअर', 'मार्केट' ह्या कादंब-यांतूनही शहरी संस्कृतीचे चित्रण खूपच वास्तवतेने केले असल्याचे दिसून येते. त्यांच्या काही कथांमधूनही अशाच प्रकारचे जीवन चित्रण येते. त्यांच्या नागरी जीवनाबद्दलच्या कादंब-यांबद्दल दिपक घारे म्हणतात 'ह.मो.मराठे यांनी या अर्बन रिॲलिटीचं फार चांगलं चित्रण आपल्या अलिकडच्या कादंब-यांतून केले आहे. त्यात 'इतिवृत्त' , 'प्रास्ताविक' यांचा आवर्जून उल्लेख करायला हवा"[6] मराठे यांच्या कादंब-यांना हे विधान सार्थ ठरवते कारण शहरी जीवनाचे वास्तव रेखाटताना बारीकसारीक तपशील कादंब-यांमधून आढळून येतात.

एकंदर नागरी समाजातील वास्तव स्वरूप रेखाटत असताना लेखक मध्यमवर्गीय समाज व व्यवस्थापकीय वर्ग मानसिकता शोधताना दिसतात. कामगार मालक संबंध कसे असावेत याच्याबद्दल लेखकाचा दृष्टीकोन उदात्त आहे. या व्यवस्थापक वर्गाने सामाजिक बांधिलकी बाळगावी, समाजाच्या हितासाठी काहीतरी करावे असा दृष्टीकोन लेखक ठेवताना दिसतात. त्याचबरोबर समाजातील दारिद्र्याचा प्रश्न, त्यांचे समाजजीवन, त्यामागची कारणमीमांसा करतात. बदलत चाललेल्या समाजात नैतिक मूल्यांचा होणारा -हास याचे वास्तव चित्रण मराठे आपल्या लेखनातून वेळोवेळी करताना दिसतात. समाजातल्या दांभिक प्रवृत्ती, भ्रष्टाचार याविरूद्ध आपल्या साहित्यातून वेळोवेळी हल्ला चढवताना दिसतात. मराठेंचे सर्वच लेखन हे सामाजिक जाणीवेतून निर्माण झाले आहे असे म्हणणे संयुक्तिक ठरेल.

समारोप

मराठी साठोत्तरी वाङ्मयात ह.मो.मराठे यांच्या लेखनाचा दृष्टीकोन आधुनिक दिसतो.कामगार, अधिकारी व व्यवस्थापक यांच्यातील संघर्षाची मूळ कारणे प्रस्तुत लेखक शोधताना दिसतात.त्यांच्यातील मानसिक ताणतणाव आपल्या कादंबरीत रेखाटताना दिसतात.

तत्कालीन महानगरीय कादंब-यांतून दिसणारे वास्तव चित्रण हे मध्यमवर्गीयांभोवती फिरणारे होते.मराठे त्याच्यापुढे जाऊन महानगरीय जीवनामागची कारणे शोधताना दिसतात.एकंदर समाजातल्या स्त्रीवर्गाची होणारी शारिरीक, मानसिक पिळवणूक त्यामागची कारणे संसार चालवताना करावी लागणारी धडपड ते रेखाटताना दिसतात.ग्रामीण व शहरी भागातील सामाजिक मूल्यांची होणारी घसरणही कादंबरीत दिसते.त्याचबरोबर मध्यमवर्गीय स्त्री-पुरूष भौतिक सुखाच्या मागे कसा लागला आहे याचे चित्रण रंजक पातळीवर जाताना दिसते.समाजातील नैतिक मूल्यांची घसरण, त्यांचा भोगवादी दृष्टीकोन लेखकाने समर्थपणे रेखाटला आहे.

नागरी कादंबरीचे लेखन करताना कादंब-यांची भाषा, व्यक्तिरेखांची नावें, त्यांची शहरी संस्कृती याचे चित्रण करताना लेखक आधुनिक विचार करताना दिसतात. लेखकाच्या वैविध्यपूर्ण लेखनात कादंबरी वाचताना कंटाळवाणी वाटते.परंतु वास्तवता समजण्यासाठी हा कंटाळवाणा भाग स्वीकारावा लागतो.लेखक नैतिक मूल्यांची घसरण दाखवताना आधुनिक विचार करताना दिसतात.लेखक नैतिक मूल्यांची घसरण दाखवताना आधुनिक विचार करताना दिसतात.म्हणून काही ठिकाणी येणारे चित्रण वास्तव असले तरी मनाला खटकते.त्यामुळे तुरळक ठिकाणचे चित्रण मनोरंजक पातळीवर जाताना दिसते.

संदर्भ


1. साहित्यसूची, दिवाळी **1985**
2. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे अंक - **241,** एप्रिल जून **1987**.
3. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले-"साहित्याचा अन्वयार्थ," मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,प्र.आ.**1996** पृ.**123**.
4. प्रा.रा.ग.जाधव- "साहित्याची सामाजिकता" , कॉन्टिनेन्टल प्रकाशन, प्र.आ.**1975,** पृ.**174**.
5. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे अंक **241,** एप्रिल जून **1987**.
6. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले-"साहित्याचा अन्वयार्थ",मेहता पब्लिशिंग हाऊस,पुणे,प्र.आ.**1996** पृ.**114**.
7. ललित ः दिवाळी **1986**.
8. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, पुणे अंक - **241,** एप्रिल जून **1987**.